# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२५**

**सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय मागण्या**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**बुधवार, दिनांक १९ मार्च, २०२५**

## जलसंपदा विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - ११**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: आय-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २७०१, मध्यम पाटबंधारे**<br>**रूपये:- १९,६०,३९,२६,०००/-**<br>**श्री. अभिजीत पाटील** |
| (१) | ४९८ | १०० | माढा (जि.सोलापूर) शहरातून जात असणारी मनकरणा नदी ही पुढे जाऊन सीना नदीस मिळते त्या ठिकाणी त्या नदीला कॅनलचा दर्जा देऊन शेतकऱ्यांचा पाण्याचा प्रश्न कायमचा मिटवता येईल त्यासाठी भरीव निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. रोहित पाटील** |
| (२) | ५२५ | १०० | कराड (जि. सातारा) येथे कृष्णा नदीवर बांधलेल्या खोडशी बंधाऱ्यापासून सुरु होऊन सांगली जिल्ह्यांत शेवट होणाऱ्या कृष्णा कालव्यांची अनेक ठिकाणी झालेली दुरावस्था झाल्याने कालव्याच्या शेवटच्या किमी पर्यंत पाणी पोचण्यास होणारी अडचण त्यामुळे कालव्यापासून लाभ मिळण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३) | ५२६ | १०० | तासगांव (जि. सांगली) तालुक्यातील सिंध्देवाडी मध्यम प्रकल्पातून सुरु झालेल्या डाव्या व उजव्या कॅनॉलची झालेली बिकट दुरावस्था, या कॅनॉलची दुरुस्ती करुन व अस्तरीकरण करण्याची आवश्यकता व कॅनॉलमधून पाणी सोडून अंजनी तलाव भरण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (४) | ५२७ | १०० | सन १९६० या वर्ष दरम्यान बांधलेल्या सांगली जिल्ह्यातील येरळा नदीवर बांधलेल्या बंधाऱ्यापासून तासगावपर्यंत असलेला कॅनॉल पूर्ण बंद पडणे, त्यामुळे हजारो एकर जमिन सिंचनापासून वंचित राहिले, या बंधाऱ्यापासून काढलेल्या कॅनोल पाणी नसल्याने अनेक ठिकाणी मुजावीण्याचा प्रकार घडलेला या कालव्याचे पुन्हा एकदा सुरू करून सिंचनासाठी पाणी दिल्यास हजारो एकर जमीन सिंचनाखाली आणण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (५) | ५४२ | १०० | तासगांव (जि. सांगली) तालुक्यांतील वाहणारी येरळा नदीसाठी ताकारी योजनेतील शिल्लक पाणी देऊन राजापूर ते निमणी दरम्यान पाच बॅरेज बंधारे बांधण्यासाठी लोक प्रतिनिधींनी शासनाकडे केलेली मागणी केलेली असणे, यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. गजानन लवटे** |
| (६) | २९१ | १०० | अंजनगाव सुर्जी तालुक्यात शेती मुख्य साधन असून हा भाग खारपण पट्ट्यात येत असल्याने सिंचनाच्या कोणत्याही उपलब्ध नसणे, या भागातील पिके पावसावर अवलंबून असणे, त्यामुळे या तालुक्यातून प्रभावित होणाऱ्या चंद्रभागा नदीवर मौजे साक्री येथे खारोळी नाला प्रकल्प प्रस्तावेत असून या प्रकल्पामुळे या तालुक्यातील पिण्याच्या पाण्यासोबतच शेतकऱ्यांना सिंचनाचे देखील सोय होऊ शकणार असणे, या प्रकल्पाकरिता आवश्यक असलेले सर्वेक्षण पूर्ण झाले असून विभागीय स्तरावर कारवाई करता प्रलंबित असणे, तसेच या प्रकल्पाकरिता पाणी उपलब्धतेचे प्रमाणपत्र देखील प्राप्त झाले असताना याकडे शासनाचे होणारे दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: आय-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २७०२, लहान पाटबंदरे**<br>**रूपये:- १०,८३,००,०००/-**<br>**श्री. अस्लम शेख** |
| (७) | ३६९ | १० | मौजे धामापूर (तालुका-मालवण, जिल्हा-सिंधुदूर्ग) गावातील शेतकऱ्यांच्या शेतजमिनींमध्ये कर्ली खाडीचे खारे पाणी भरतीच्या वेळी शेतात शिरून शेत जमिनींचे मोठ्या प्रमाणात नुकसान होणे, खाडीच्या खाऱ्या पाण्यापासून शेतीचे संरक्षण करण्यासाठी गावातून वाहणाऱ्या पोईकालवा बंधाऱ्यावर प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करुन कायमस्वरुपी उघडझाप करणारी झडपे असलेला सिमेंटचा पक्का बंधारा बांधून देण्यासाठी ग्रामस्थयांनी खारभूमी विभागाकडून धामापूर पोईकालव्यावरील बंधाऱ्याचा बृहत आराखड्यात समाविष्ट करण्याबाबत प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यासाठी उप कार्यकारी अभियंता, सिंधुदूर्ग खारभूमी विकास विभाग, कणकवली सिंधुदूर्ग' यांना नोव्हेंबर, २०२३ मध्ये शेतकऱ्यांच्या शेतजमिनींचे ७/१२ प्रतींसह निवेदन देणे, खारभूमी विकास मंडळांतर्गत मंजूर बृहत आराखड्यानुसार ५७५ योजनांचा समावेश असणे. या योजनांमध्ये धामापूर योजना समाविष्ट नसणे, त्यामुळे ही योजना खाजगी खारभूमी योजना म्हणून शासनाकडून विचारात घेतली जात असणे, खारभूमी विभागाकडून धामापूर पोईकालव्यावरील बंधाऱ्याच्या बृहत आराखड्यात समाविष्ट करण्याबाबत जलसंपदा विभाग अधिकाऱ्यांनी सातत्याने केलेले जाणीवपूर्वक दुर्लक्ष, तसेच सदर बंधारा जिल्हापरिषद, सिंधुदूर्ग यांच्यामार्फत बांधण्यात आलेला असून त्याबाबत सिंधुदुर्ग जिल्हापरिषदकडे निधी उपलब्ध नसणे, शासनाच्या अस्तित्वातील व भविष्यकालीन योजनामध्ये सदर योजनेचा समावेश करण्याबाबत शासन कामात दिरंगाई करीत असणे, कायमस्वरुपी उघडझाप करणारी झडपे असलेला सिमेंटचा पक्का बंधारा बांधून देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (८) | ३७० | १० | जागतिक वारसा लाभलेल्या प्राचिन शिवकालीनपूर्व सन १५३० मध्ये तयार करण्यात आलेल्या धामापूर (तालुका-मालवण, जिल्हा-सिंधुदूर्ग) धरणाच्या पाण्याचा काळसे-धामापूर तसेच, मालवण तालुक्यातील दहा-पंधरा गावांना पिण्यासाठी उपयोग होणे, तसेच सदर धरणाचे पाणी भविष्यात सिंधुदुर्ग जिल्ह्यातील चिपी विमानतळाकडे नेण्याचे शासनाचे नियोजन असल्याचे समजते, धरणामध्ये मोठ्या प्रमाणावर गाळ साचला असणे, सदरचा गाळ उपसण्यासाठी काळसे-धामापूर गावांतील ग्रामस्थानी सातत्याने मा. जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांचेकडे मागणी करणे, उपसा केलेला गाळ शेत-बागायती सखल भागात टाकण्यासाठी जमीन उपलब्ध करुन देण्यास या भागातील ग्रामस्थ तयार असणे, धामापूर (मालवण) येथील सालावातील गाळ उपसा करुन घामापूर-काळसे, तसेच, मालवण तालुक्यातील गावांना शुध्द पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याच्यादृष्टीने धरणात साचलेला गाळ उपसण्याच्यादृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: आय-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २७११, पूर नियंत्रण व जलनिसारण**<br>**रूपये:- ३०,२४,८२,०००/-**<br>**श्री. बापूसाहेब पठारे** |
| (९) | ५५५ | १०० | पुणे शहरामध्ये शांतीनगर, येरवडा, विश्रांतवाडी कळस सिंहगड रोड, आदी भागात दरवर्षी पावसाळयात मुळा मुठा नदीचे पाणी शिरून घरे पाण्याखाली जाणे, त्यामुळे हजारो नागरिक पुराच्या पाण्यात बाधित होणे, त्याकरिता दरवर्षी शासनाला लाखो रुपये खर्च करुन उपाययोजना कराव्या लागणे, परंतु केलेल्या उपाययोजना या तुटपुंजा स्वरूपाच्या असणे, त्यामुळे नागरिकांचे अतोनात हाल होणे पर्यायाने शासनाने केलेला खर्च वाया जाणे, सदर भागामध्ये दर वर्षी येणारी पूरस्थिती रोखण्यासाठी जलसंपदा विभागाने पूर रेषा कायम करणे, महानगरपालिकेने या भागातील नागरिकांना कायमस्वरूपी पक्की घरे इतरत्र देऊन त्यांचे पुनर्वसन करणे, सदर जागा पुन्हा अतिक्रमित होऊ नये म्हणून या ठिकाणी गार्डन किंवा इतर सार्वजनिक कामासाठी उपयोगात आणणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: आय-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४७०१, मध्यम पाटबंधारे यावरील भांडवली खर्च**<br>**रूपये:- ४,७९,५८,८४,०००/-**<br>**श्री. राजु खरे** |
| (१०) | ५५६ | १० | मोहोळ, जिल्हा सोलापूर येथे मोठ्या योजना असणे, एक आष्टी उपसा सिंचन योजना व शिरापूर उपसा सिंचन योजना या दोन खूप मोठ्या योजना असल्यामुळे सदर योजना केवळ निधीमुळे रखडलेल्या असणे, पाण्याची खूप मोठी उपलब्ध होऊन मोहोळ तालुक्यातील जनतेच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न तसेच जनावरांच्या पिण्याचा पाण्याचा प्रश्न तसेच शेतीसाठी लागणारे पाणी या सर्व समस्या दोन उपसा सिंचन योजना झाल्यामुळे पूर्ण होणार असणे, सन २०२५-२६ च्या |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | अर्थसंकल्पामध्ये फक्त आष्टी उपशासन योजनेला भूसंपादनासाठी निधी मंजूर करण्यात आलेला असणे, परंतु शिरापूर उपसा सिंचन योजनेसाठी तरतूद या अर्थसंकल्पामध्ये करण्यात आलेली नसणे, सदर उपसा सिंचनसाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: आय-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४७००, मोठे पाटबंधारे यावरील भांडवली खर्च**<br>**रूपये:- ९५,६७,५९,३४,०००/-**<br>**डॉ. बाबासाहेब देशमुख** |
| (११) | ५५० | १० | ढाळेवाडी, महुद बुद्रुक या ग्रामपंचायत हद्दीतील लोकसंख्या ही २५ हजारांहून अधिक असून येथील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती व पशुपालन आहे. हा भाग सांगोला तालुक्यातील दुष्काळग्रस्त म्हणून ओळखला जातो. ढाळेवाडी येथे ६५ एकर क्षेत्र गायरान जमीन असून याठिकाणी पाझर तलाव बांधल्यास येथील लोकांची पाण्याची टंचाई दूर होई ल आणि काही शेतीभाग ओलीताखाली येईल यासाठी ढाळेवाडी, महुद बुद्रुक ता. सांगोला येथे १५ कोटी लिटर क्षमतेच्या पाझर तलावासाठी मंजूरी देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

---

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : १८ मार्च, २०२५**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) जलसंपदा विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई